**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. १०/७/२०२६**

**पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र.५ (पुरवणी)**
**जुलै २०२६**

**सोमवार दिनांक २० जुलै २०२६ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आलेल्या आहेत.**

**:- मा. सभासदांचे प्रस्ताव -:**

**विषय क्र.१०९**

संदर्भ- मा.उज्वला जंगले व मा.मारूती तुपे यांची सूचना दि.१३/४/२०२६

-----

प्रभाग क्र.१६ हडपसर गाव सातववाडी पुणे महानगरपालिका समान पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत काळे बोराटे नगर ग्लायडिंग सेंटर झोन मधील गजानन महाराज मंदिर या ठिकाणची टाकी पूर्ण झाली असून, त्याचे उद्घाटन मा.नामदार चंद्रकांत दादा पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण , महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात यावे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा.नामदार योगेश टिळेकर ,आमदार विधान परिषद , मा.नामदार चेतन तुपे पाटील, आमदार हडपसर विधानसभा, मा.धीरज घाटे, अध्यक्ष, पुणे शहर भारतीय जनता पार्टी तसेच पुणे शहरातील सर्व नामदार खासदार व सर्व नामदार आमदार प्रभागातील सर्व नगरसेवक इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**विषय क्र.११०**

संदर्भ- मा.अनिल टिंगरे व मा.राघवेंद्र मानकर यांची सूचना दि.१५/४/२०२६

-----

प्रभाग क्र.१ मधील कळस ( पुणे शहर हद्द प्रारंभ बिंदू ) येथे दरवर्षी लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळ्याचे प्रथम स्वागत पुणे महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या उत्साहात करण्यात येते. संत परंपरेचा सन्मान राखण्यासाठी तसेच पुणे शहराच्या सांस्कृतिक ओळखीला अधोरेखित करण्यासाठी कळस येथे कायमस्वरूपी, सुबक व भव्य स्वागत कमान उभारणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रभाग क्र.१ मधील कळस ( पुणे शहर हद्द प्रारंभ बिंदू ) येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा स्वागत कमान उभारण्यास मान्यता मिळावी.

**विषय क्र.१११**

संदर्भ- मा.प्रशांत जगताप व मा.ॲड.रामचंद्र कदम, पक्षनेते, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष यांची सूचना दि.२३/४/२०२६

-----

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र.१८ वानवडी – साळुंखे विहार संविधान चौक येथील ध्वजस्तंभाचे उद्घाटन दि.७ मे २०२६ रोजी सकाळी ११=०० ( अकरा ) वाजता मा.हर्षवर्धनजी सपकाळ, कॉंग्रेस पक्ष प्रदेशाध्यक्ष यांचे

शुभहस्ते व मा.मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री सहकार, नागरी विमान वाहतूक, भारत सरकार, मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा मंत्री नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम, मा.ना.श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षण, वस्त्रोउद्योग, संसदीय कामकाज मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.डॉ.निलम गोऱ्हे ,उपसभापती, विधानपरिषद, मा.ना.श्रीमती माधुरी मिसाळ, शहरी विकास, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा.मेधा कुलकर्णी, खासदार, मा.अमोल कोल्हे, खासदार, मा.सुप्रिया सुळे, खासदार, मा.अरूण लाड,आमदार, मा.जयंत आसगावकर, आमदार, मा.योगेश टिळेकर, आमदार, मा.चेतन तुपे, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा.विजयबापू शिवतारे, आमदार, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा.बापूसाहेब पठारे,आमदार, मा.हेमंत रासने,आमदार,मा.शंकर मांडेकर, आमदार, मा.ज्ञानेश्वर कटके, आमदार यांचे सन्माननीय उपस्थितीत तसेच मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर, मा.श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष,स्थायी समिती, मा.गणेश बिडकर, सभागृहनेते, मा.ॲड.निलेश निकम, विरोधी पक्षनेते, मा.ॲड.रामचंद्र कदम, पक्षनेते, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, मा.सोपान चव्हाण, पक्षनेते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (श.प.गट ), मा.नितीन गावडे, पक्षनेते, शिवसेना पक्ष, ( उ.बा.ठा.गट ), मा.हिमाली कांबळे, पक्षनेत्या, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आ ), मा.स्मिता वस्ते,अध्यक्षा, शहर सुधारणा समिती, मा.अल्पना वरपे, अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.स्वरदा बापट, अध्यक्षा, विधी समिती, मा.नारायण गलांडे, अध्यक्ष, क्रीडा समिती,मा.पल्लवी जावळे, अध्यक्षा, नांव समिती, मा.अरूण राजवाडे, अध्यक्ष, शिक्षण समिती, मा.ॲड.साहिल केदारी, अध्यक्ष वानवडी प्रभाग समिती व स्थानिक नगरसेवक, मा.कालिंदा पुंडे, स्थानिक नगरसेविका, मा.कोमल शेंडकर, स्थानिक नगरसेविका, मा.प्रशांत जगताप, स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.११२</u>**

संदर्भ– मा.परशुराम वाडेकर ,उपमहापौर व मा.हिमाली कांबळे, पक्षनेत्या, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ )यांची सूचना दि.५/५/२०२६

-----

महात्मा ज्योतीबा फुले यांचे द्वीशताब्दी वर्ष यंदा साजरे होत आहे.तसेच म.फुले यांना पुणे महानगरपालिकेचे सदस्य म्हणून दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचबरोबर चवदार तळे सत्याग्रहास १०० वर्षे पूर्ण होत आहेत. म.फुले यांचे द्वीशताब्दी वर्ष संपूर्ण देशात, राज्यात मोठ्या उत्साहात साजरे होत असताना, त्यांची कर्मभूमी राहिलेल्या पुणे महानगरपालिकेमध्ये हे वर्ष मोठ्या उत्सहात साजरे करण्यासाठी मा.महापालिका आयुक्त यांनी बजेट उपलब्ध करून देणेबाबत मा.स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. तसेच माहे एप्रिल २०२६ च्या झालेल्या मुख्यसभेमध्ये मा.सभासदांनी म.फुले यांची द्वीशताब्दी साजरी करताना वर्षभर विविध कार्यक्रम राबविणेसाठी तीव्र व आग्रही मागणी केली होती. सदर चर्चेवेळी सभापती म्हणून मा.उपमहापौर यांनी वर्षभर द्वीशताब्दी साजरी करणेबाबत समिती गठीत करून कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत प्रशासनास आदेश दिलेले आहेत. महात्मा ज्योतीबा फुले यांचे द्वीशताब्दी वर्ष तसेच चवदार तळे सत्याग्रहास १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने वर्षभर पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन करणे, कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणेसाठी पुणे महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, गटनेते व या विषयातील दोन तज्ञ व्यक्ती यांची एक समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमार्फत संपूर्ण वर्षभराचे कार्यक्रमाचे नियोजन करून, विविध कार्यक्रम राबविणेत यावेत.मा.महापौर व मा.महा.आयुक्त यांनी नगरसेवक व अधिकारी यांचेमधून तज्ञ व्यक्तींची नियुक्ती करण्याचे अधिकार देण्यात यावेत. तसेच वर्षभर राबविण्यात येणारे कार्यक्रमांचे सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>विषय क्र.११३</u>**

संदर्भ– मा.दत्तात्रय बहिरट, मा.ॲड.निलेश निकम, विरोधी पक्षनेते, मा.अंजली ओरसे यांची सूचना दि.२९/६/२०२६

-----

प्रभाग क्र.७ड, मधील मॅफको आवारातील ६० लक्ष लिटर्स पाण्याच्या टाकीचे उद्घाटन समारंभ मा.ना.श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते आणि केंद्रीय राज्यमंत्री व मा.ना.चंद्रकांत दादा पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कामकाज मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच मा.खासदार, मा.आमदार व मा.स्थानिक नगरसेवक यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात यावा.

**<u>विषय क्र.११४</u>**

संदर्भ– मा.हरिदास चरवड यांची सूचना दि.६/५/२०२६

-----

पुणे महानगरपालिका अग्निशामक दल, कात्रज विभागातील अधिकारी प्रभारी उप अग्निशमन अधिकारी श्री.संतोष भिलारे, फायरमन श्री.किरण पाटील, श्री.मयूर काटे, श्री.प्रशांत कुंभार , चालक श्री.बंडू गवळे यांनी दोन भिंतीमध्ये अडकलेल्या बालकाचे प्राण वाचविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून, त्यांच्या धाडसी व कर्तव्यदक्ष कार्याची नोंद पुणे महानगरपालिकेच्या अभिलेखात घेण्यात यावी.

**<u>विषय क्र.११५</u>**

संदर्भ– मा.राघवेंद्र मानकर व मा.स्वरदा बापट यांची सूचना दि.१२/५/२०२६

-----

पुणे महानगरपालिकेतर्फे धर्मवीर छत्रपती संभाजीराजे स्मारक नुतनीकरण भूमिपूजन सोहळा दि.१४ मे २०२६ रोजी सकाळी ०९=०० ( नऊ ) वाजता मा.मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री सहकार, नागरी विमान वाहतूक, भारत सरकार यांचे शुभहस्ते व मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा मंत्री नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम, मा.ना.श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षण, वस्त्रोउद्योग, संसदीय कामकाज मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.डॉ.निलम गोऱ्हे ,उपसभापती, विधानपरिषद, मा.ना.श्रीमती माधुरी मिसाळ, शहरी विकास, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा.मेधा कुलकर्णी, खासदार, मा.अमोल कोल्हे, खासदार, मा.सुप्रिया सुळे, खासदार, मा.अरूण लाड,आमदार, मा.जयंत आसगावकर, आमदार, मा.योगेश टिळेकर, आमदार, मा.सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा.विजयबापू शिवतारे, आमदार, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.चेतन तुपे, आमदार, मा.बापूसाहेब पठारे,आमदार, मा.हेमंत रासने,आमदार,मा.शंकर मांडेकर, आमदार, मा.ज्ञानेश्वर कटके, आमदार यांचे सन्माननीय उपस्थितीत तसेच मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर, मा.श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष,स्थायी समिती, मा.गणेश बिडकर, सभागृहनेते, मा.ॲड.निलेश निकम, विरोधी पक्षनेते, मा.ॲड.रामचंद्र कदम, पक्षनेते, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, मा.सोपान चव्हाण, पक्षनेते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (श.प.गट ), मा.नितीन गावडे, पक्षनेते, शिवसेना पक्ष, ( उ.बा.ठा.गट ), मा.हिमाली कांबळे, पक्षनेत्या, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आ ), मा.स्मिता वस्ते,अध्यक्षा, शहर सुधारणा समिती, मा.अल्पना वरपे, अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.स्वरदा बापट, अध्यक्षा, विधी समिती, मा.नारायण गलांडे, अध्यक्ष, क्रीडा समिती,मा.पल्लवी जावळे, अध्यक्षा, नांव समिती, मा.अरूण राजवाडे, अध्यक्ष, शिक्षण समिती,मा.अमृता म्हेत्रे,अध्यक्ष छत्रपती

शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रीय कार्यालय व स्थानिक नगरसेविका, मा.अपूर्व खाडे,स्थानिक नगरसेवक, मा.पुजा जागडे, स्थानिक नगरसेविका, मा.निवेदिता एकबोटे, स्थानिक नगरसेविका, मा.मंजुश्री खर्डेकर,अध्यक्षा, वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय व स्थानिक नगरसेविका, मा.सुनील पांडे, स्थानिक नगरसेवक, मा.ॲड.मिताली सावळेकर, स्थानिक नगरसेविका,मा.पुनीत जोशी, स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.११६</u>**

संदर्भ– मा.ऐश्वर्या पठारे, मा.पुजा जागडे व मा.कोमल नवले यांची सूचना दि.२९/५/२०२६

-----

महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उल्लेखनीय व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन व सन्मान मिळावा. तसेच समाजामध्ये महिलांच्या कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार सुरू करण्यात यावा. असा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. भारतीय इतिहासामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याणकारी राज्यकारभार, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण व जनहिताची परंपरा निर्माण केली.त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजामध्ये विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव होणे आवश्यक आहे. महिला अत्याचार प्रतिबंध, हुंडा निर्मूलन,लिंग चिकित्सा प्रतिबंध, घरगुती हिंसा प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, आरोग्य, साक्षरता, मुलींचे शिक्षण, सामाजिक जनजागृती तसेच महिला व बाल कल्याण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात यावा.तरी पुणे महानगरपालिकेच्या वतीने दर वर्षी ३१ मे रोजी जयंती दिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी व त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तसेच प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.११७</u>**

संदर्भ– मा.अतुल तरवडे व मा.प्राची आल्हाट यांची सूचना दि.१/६/२०२६

-----

प्रभाग क्र.४१ महंमदवाडी उंड्री येथील सर्वे नं.९१ महंमदवाडी येथे हिंदवी स्वराज्याचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>विषय क्र.११८</u>**

संदर्भ– मा.सौ.कालिंदा पुंडे व मा.अतुल तरवडे यांची सूचना दि.१/६/२०२६

-----

प्रभाग क्र.१८ वानवडी – साळुंखे विहार येथील सर्वे नं.६३ कै.अनुसया सादबा लोणकर उद्यान येथे हिंदवी स्वराज्याचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>विषय क्र.११९</u>**

संदर्भ– मा.गणेश बिडकर, सभागृहनेते व मा.ॲड निलेश निकम , विरोधी पक्षनेते यांची सूचना दि.२२/६/२०२६

-----

आदरणीय लोकनेते अजितदादा पवार यांचे तैलचित्र पुणे महानगरपालिकेच्या दर्शनी भागात लावण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्य सभा व मा.राज्यशासन मान्यता देईल या भरवशावर तत्काळ कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.१२०</u>**

संदर्भ– मा.गणेश बिडकर, सभागृहनेते यांची सूचना दि.२९/६/२०२६

-----

पुणे महानगरपालिकेच्या श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज उद्यान, सोमवार पेठ येथे श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्यात यावा. सदर ठिकाणी पुतळा बसविण्यासाठी विजय मित्र मंडळ ट्रस्ट, सोमवार पेठ, पुणे या मंडळाच्या वतीने श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा पुणे महानगरपालिकेस भेट स्वरूपात देण्यात येणार आहे. तो स्विकारण्यात यावा.

**<u>विषय क्र.१२१</u>**

संदर्भ – मा.गणेश बिडकर, सभागृहनेते, मा.श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष,स्थायी समिती, मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर, मा.ॲड.निलेश निकम,विरोधी पक्षनेते, मा.ॲड.रामचंद्र कदम, पक्षनेते, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, मा.नितीन गावडे, पक्षनेते, शिवसेना ( उ.बा.ठा.गट ), मा.सोपान चव्हाण, पक्षनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.गट ) यांची सूचना २९/६/२०२६

-----

नसरापूर प्रकरणातील आरोपी नराधामास फास्ट ट्रॅकवर कोर्ट केस प्रकरण चालवून त्या नराधामास त्वरित फाशीची शिक्षा सुनावल्याबद्दल गृहविभाग व मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब,मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन व न्यायालयाचे मन:पूर्वक आभार मानत आहोत.

**<u>विषय क्र.१२२</u>**

संदर्भ – मा.गणेश बिडकर, सभागृहनेते, मा.श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष,स्थायी समिती, मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर, मा.ॲड.निलेश निकम,विरोधी पक्षनेते, मा.ॲड.रामचंद्र कदम, पक्षनेते, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, मा.नितीन गावडे, पक्षनेते, शिवसेना ( उ.बा.ठा.गट ), मा.सोपान चव्हाण, पक्षनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.गट ) यांची सूचना २९/६/२०२६

-----

स्व.अजितदादा पवार यांचे जयंतीनिमित्त २२ जुलै रोजी प्रतिवर्षी पुणे महानगरपालिकेतील त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात यावा.

**(टिप :– विषय क्र. १०९ ते १२२ हे दि. २९/६/२०२६ च्या पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झाले आहेत.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–१०/०७/२०२६.

**योगिता भोसले**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**